# २९ मे पासून पनवेलमध्ये
# ‘राजीव गांधी सुवर्ण चषक राष्ट्रीय कबडडी स्पर्धा ’
## अनेक दिग्गज मान्यवरांची लाभणार उपस्थिती

पनवेल(प्रतिनिधी) श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्यावतीने आणि ॲम्युचर कबडडी फेडरेशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य कबडडी असोसिएशन व रायगड जिल्हा कबडडी असोसिएशन यांच्या यांच्या मान्यतेने २९ मे ते ०१ जून २०१४ या कालावधीत अखिल भारतीय स्तरावरील ‘राजीव गांधी सुवर्ण चषक कबडडी स्पर्धा २०१४’ खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालयाच्या भव्य क्रिडांगणावर आयोजित करण्यात आली असून, या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महिला व पुरूष असे प्रत्येकी १६ नामांकित संघ सहभागी होणार आहेत.तसेच रायगड जिल्हास्तरीय संघांना वाव देण्यासाठी स्वतंत्र ‘जिल्हास्तरीय स्पर्धा’ही आयोजित केली आहे.यामध्ये जिल्हयातील ०८ नामांकित संघ सहभागी होणार असून या स्पर्धेतील एकूण विजेत्यांना १३ लाखांहून अधिक रूपयांची रोख रक्कमेची पारितोषिके देण्यात येणार असल्याची माहिती श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (रविवार, २५ मे) खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते लोकनेते दि.बा.पाटील यांचे या कबडडीच्या क्रीडानगरीला नाव देण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या पत्रकार परिषदेस महाराष्ट्र राज्य कबडडी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक शरद कदम, पनवेल शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष जयंत पगडे, शहर प्रवक्ते व शिक्षण मंडळाचे सभापती वाय.टी.देशमुख, नगर परिषदेतील कॉंग्रेसचे गटनेते अनिल भगत, विचार विभागाचे जिल्हाध्यक्ष कांतीलाल कडू, इंटकचे तालुकाध्यक्ष संजय पाटील, एसएसयुआयचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.टी.गडदे, सीकेटी विद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार जाधव, ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे आणि पत्रकार मोठया संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेविषयी माहिती देताना आ.प्रशांत ठाकूर यांनी पुढे सांगितले की, गुरूवार दिनांक २९ मे रोजी सायंकाळी ०५ वाजता कबडडी स्पर्धेचे उदघाटन महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते तसेच जलसंपदा व रायगडचे पालकमंत्री सुनिल तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सिडकोचे चेअरमन प्रमोद हिंदुराव, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार भाई जगताप, आमदार किरण पावसकर, महाराष्ट्र राज्य कबडडी असोसिएशनचे अध्यक्ष किशोर पाटील, माजी आमदार मधुकर ठाकूर, माजी आमदार शाम सावंत, सिडकोचे संचालक नामदेव भगत, रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आर.सी.घरत, महाराष्ट्र राज्य कबडडी असोसिएशनचे सहकार्यवाह रमेश देवाडीकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तर रविवार दिनांक ०१ जूनला सायंकाळी ०७ वाजता पारितोषिक वितरण कॉंग्रेसचे महाराष्ट्र राज्य प्रभारी मोहन प्रकाश यांच्या हस्ते व अल्पसंख्यांक मंत्री नसीम खान यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष ॲड.राजीव सातव, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी मंत्री रवीशेठ पाटील, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे उपाध्यक्ष मुश्ताक अंतुले, सरचिटणीस व माजी आमदार माणिकराव जगताप, महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष विश्वजीत कदम, महाराष्ट्र राज्य कबडडी असोसिएशनचे कार्याध्यक्ष डॉ.दत्ता पाथरीकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रसिध्द शरीर सौष्ठवपट्टू मिस्टर आशिया सुहास खामकर, प्रसिध्द हॉकीपट्टू पदमश्री धनराज पिल्ले, प्रसिध्द हास्य सिने अभिनेता जॉनी लिव्हर या सेलेब्रेटींची उपस्थिती लाभणार असून २६/११ मुंबईतील दहशतवादी हल्ल्यातील रक्षक अर्जुन जाधव व त्यांच्या कुटूंबियांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय कबडडी स्पर्धेतील पुरूष व महिला गटातील प्रथम कमांकास ०२ लाख रूपये व भव्य चषक, व्दितीय कमांकास ०१ लाख ५० हजार रूपये व आकर्षक चषक, तृतीय व चतुर्थ कमांकास प्रत्येकी ७५ हजार रूपये व आकर्षक चषक तसेच मालिकावीर होणाऱ्या खेळाडूस २५ हजार रूपये, उत्कृष्ट पकड आणि उत्कृष्ट चढाई यांना प्रत्येकी १५ हजार रूपये तर प्रत्येक दिवसातील उत्कृष्ट खेळाडूस आठ हजार रूपयांचे रोख रक्कमेचे पारितोषिक देवून गौरविण्यात येणार आहे.रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेतील विजेत्या संघास ८१ हजार रूपये व भव्य चषक, उपविजेत्या संघास ५१ हजार रूपये व आकर्षक चषक, तृतीय व चतुर्थ कमांकास प्रत्येकी २१ हजार रूपये व आकर्षक चषक तसेच मालिकावीर होणाऱ्या खेळाडूस ०७ हजार रूपये, उत्कृष्ट पकड आणि उत्कृष्ट चढाई यांना प्रत्येकी ०५ हजार रूपये तर प्रत्येक दिवसातील उत्कृष्ट खेळाडूस सहा हजार रूपयांचे पारितोषिक देवून सन्मानित करण्यात येणार आहे.

कबडडी स्पर्धेच्या यशस्वी नियोजनासाठी सुकाणू समिती, स्वागत समिती, साहित्य पुरवठा समिती, क्रिडांगण समिती, निवास व्यवस्था समिती, भोजन समिती, प्रसिध्दी समिती, प्रथोमपचार समिती, तक्रार निवारण समिती, बक्षिस वितरण समिती, वाहतूक समिती, संचलन समिती, सुत्र संचालन समिती, निमंत्रण वाटप समिती अशा विविध समित्या स्थापन करण्यात आल्या असल्याची माहिती आ.ठाकूर यांनी यावेळी दिली.

राष्ट्रीय स्पर्धेत पुरूष गटातून नॉर्थन रेल्वे, डि.एम.डब्ल्यू पंजाब, हरियाणा पोलीस, सि.आर.पी.एफ., यु.पी.पोलीस, ऐड आर्मी, बी.एस.एफ-सी.आय.एस.एफ, एअर इंडिया, बीपीसीएल, महाराष्ट्र पोलीस, महिन्द्रा ॲन्ड महिन्द्रा, बीईजी पुणे, सेंट्रल रेल्वे, आरसीएफ मुंबई, इंडियन नेव्ही तर महिला गटात पाळम स्पोर्टस दिल्ली, हरियाना राज्य, हिमाचल प्रदेश, मणिपूर, वैष्णवी हैद्राबाद, छत्तीसगड राज्य, राणा स्पोर्टस पंजाब, वेस्ट बंगाल, विहार राज्य, सुवर्णयोग पुणे, शिवशक्ती मुंबई, जिजाऊ पुणे, शिरोडकर मुंबई, श्री शिवाजी उदय मंडळ सातारा, चेंबूर कीडा मंडळ, अमर हिंद मंडळ मुंबई, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस कॉम्प्लेक्स पनवेल, हे नामांकित राष्ट्रीय स्तरावरील संघ तसेच रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत ज्ञानेश्वर कोलवे, कळंबादेवी गडब, श्रीराम कमळपाडा, नवजीवन पेझारी, जय भवानी पनवेल, नवकुमार मुद्रे कर्जत, गणेश क्लब गणेशपूर, सोनारसिध्द धाटाव हे नामवंत संघ खेळणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कबडडी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक शरद कदम यांनी यावेळी दिली. पनवेलमध्ये होणाऱ्या या स्पर्धेसाठी कोणतेही प्रायोजक न घेता श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने लोकनेते रामशेठ ठाकूर सर्व शक्तीनिशी योगदान देत असतात. कबडडीच्या उन्नत्तीसाठी सदैव प्रयत्न करणारे व मोलाच्या योगदानाबद्दल कबडडी फेडरेशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य कबडडी असोसिएशन व रायगड जिल्हा कबडडी असोसिएशन आणि खेळाडूंच्यावतीने भव्य सत्कार करण्यात येणार असल्याचेही कदम यांनी आवर्जुन नमूद केले.